**ठळक बातम्या**

- नवी दिल्लीत रायसीना डायलॉगला सुरुवात, जागतिक पातळीवर भारताचं महत्त्व वाढत असल्याचं फिनलंडच्या अध्यक्षांचं प्रतिपादन

- भारत आणि फिनलंडमध्ये पर्यावरण, सांख्यिकी क्षेत्रात महत्त्वाचे करार

- चालू आर्थिक वर्षात राज्याचा आर्थिक विकास दर ८ टक्क्यांच्या जवळ राहण्याची शक्यता, वित्तीय तूट ३ टक्क्यांपेक्षा कमी

- राज्यसभा निवडणुकीसाठी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, शरद पवार, विनोद तावडे, रामदास आठवले यांच्यासह विविध उमेदवारांचे अर्ज दाखल

- संसदीय निवडणुकांसाठी नेपाळमध्ये शांततेत मतदान

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतल्या उपांत्य फेरीतल्या सामन्यात भारताविरुद्ध नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा इंग्लंडचा निर्णय

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवीदिल्लीत ११ व्या रायसीना डायलॉगचं उद्घाटन केलं. फिनलंडचे अध्यक्ष डॉ. अलेक्झांडर स्टब यांनी यावेळी उपस्थितांना संबोधित केलं. जगातल्या घडामोडींची सूत्रं आता ग्लोबल साऊथकडे आली आहेत आणि त्यात भारताची भूमिका महत्त्वाची असेल असं स्टब यावेळी म्हणाले. पाश्चिमात्य देशांचं वर्चस्व असल्याची परिस्थिती आता कालबाह्य झाली आहे. ग्लोबल साऊथकडे आता अर्थव्यवस्था आणि मनुष्यबळ अशी दोन बलस्थानं आहेत. पाश्चिमात्य देशांना याची जाणीव व्हायला काही काळ जावा लागेल, असं त्यांनी सांगितलं.

आंतरराष्ट्रीय नियमांना तिलांजली दिली तर जागतिक परिस्थिती बिकट व्हायला वेळ लागणार नाही. त्यामुळं सत्ता समीकरणं निश्चित करण्यावर पाश्चिमात्य देशांनी तोडगा काढावा असं आवाहन त्यांनी केलं. कुठल्याही एका देशावर अवलंबून न राहण्याचं धोरण भारतानं स्वीकारलं आहे आणि हे योग्य असल्याचं स्टब म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फिनलंडचे अध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांच्यात आज नवी दिल्ली इथं महत्त्वपूर्ण चर्चा झाली. या बैठकीनंतर उभय देशांदरम्यान आज पर्यावरणविषयक सहकार्य, स्थलांतर, आणि सांख्यिकी अशा विविध क्षेत्रातले महत्त्वाचे करार झाले. सध्या जग अनिश्चिततेच्या आणि अस्थिरतेच्या फेऱ्यात असून युक्रेन ते पश्चिम आशिया भूराजकीय संघर्ष धगधगत असताना भारत आणि युरोपदरम्यान सहकार्याचं सुवर्णयुग सुरु होत असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी बैठकीनंतरच्या संयुक्त निवेदनात सांगितलं.

**होल्ड प्रधानमंत्री बाइट**

भारत जगातला सर्वात मोठा लोकशाही देश आणि सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असून फिनलंडसाठी महत्त्वाचा भागीदार आहे, असं अलेक्झांडर स्टब म्हणाले.

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षात राज्याच्या आर्थिक विकास दरात ७ पूर्णांक ९ दशांश टक्के वाढ अपेक्षित आहे. सेवा क्षेत्रात सर्वाधिक ९ टक्के, उद्योग क्षेत्रात ५ पूर्णांक ७ दशांश टक्के आणि कृषी आणि संलग्न क्षेत्रात ३ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा अंदाज राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात मांडण्यात आला आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*चालू आर्थिक वर्षात राज्याचं एकूण उत्पन्न ५१ लाख ५९७ कोटी राहण्याची अपेक्षा आहे. राज्याचं दरडोई उत्पन्न सुमारे ३ लाख ४८ हजार रुपये असल्याचं अहवालात म्हटलं आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत यात ३० हजार रुपयांची वाढ झाली आहे. राष्ट्रीय पातळीवर २ लाख ५ हजार ३२४ रुपये दरडोई उत्पन्न आहे. दरडोई उत्पन्नात तेलंगणा, कर्नाटक, तमिळनाडू, गुजरात नंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. जिल्ह्यांचा विचार करता मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, रायगड हे जिल्हे दरडोई उत्पन्नात आघाडीवर असून हिंगोली, बुलढाणा, वाशिम, गडचिरोली, नंदूरबार हे शेवटच्या ५ स्थानी आहेत.*

*देशाच्या सांकेतिक स्थूल देशांतर्गत उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा १४ टक्के असून तो देशातील सर्वाधिक आहे. देशाच्या एकूण निर्यातीत राज्याचा हिस्सा १५ टक्के आहे.*

*या आर्थिक वर्षात राज्याची आर्थिक महसुली जमा ५ लाख ६० हजार ९६४ कोटी तर महसुली खर्च ६ लाख ६ हजार ८५५ कोटी राहील असा अंदाज अहवालात वर्तवण्यात आला आहे. राजकोषीय तूट २०२४-२५ या आर्थिक वर्षात, २ पूर्णांक ७ दशांश टक्के तसेच महसुली तूट ९ दशांश टक्के राहण्याचा अंदाज आहे. त्यापूर्वीच्या आर्थिक वर्षात ही तूट २ पूर्णांक २ दशांश टक्के होती. बिहारमध्ये वित्तीय तूट ९ टक्क्यांच्यावर आहे तर आंध्र प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, मध्यप्रदेश, पश्चिम बंगालमध्ये हे प्रमाण ४ टक्क्यांच्या वर आहे.*

*राज्याच्या कर्जात ११ पूर्णांक १ दशांश टक्के म्हणजे सुमारे ९३ हजार कोटींची वाढ अपेक्षित असून चालू आर्थिक वर्षात राज्यावर ९ लाख ३२ हजार २४२ कोटींचा कर्जभार आहे. त्यावर राज्य सरकार ६४ हजार ६५९ कोटी रुपये व्याज देणार आहे.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी विधानभवनातून कौस्तुभ पटाईत*

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस उद्या दुपारी २ वाजता राज्याचा अर्थ संकल्प सादर करतील.

**<><><><><>**

राज्य मंत्रिमंडळानं आज धर्मांतर विरोधी कायद्याच्या मसुद्याला मंजुरी दिल्याची माहिती मंत्री नितेश राणे यांनी बातमीदारांशी बोलताना दिली. धर्म स्वतंत्र अधिनियम २०२६ या नावानं हा कायदा केला जाणार आहे. या अंतर्गत अजामीन पात्र गुन्हे दाखल होणार असल्यानं लव्ह जिहादसारखी प्रकरणं घडणार नाहीत असं ते म्हणाले.

**<><><><><>**

इ-चलान रद्द करण्याबाबत शासन सकारात्मक भूमिका घेणार असल्याचं आश्वासन सरकारनं दिल्यावर वाहतूकदारांनी राज्यव्यापी संप आज मागे घेतला. रात्रीपासून हा संप सुरू झाला होता. वाहतूकदारांच्या विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी लवकरच पोलीस आणि परिवहन विभागाची संयुक्त बैठक बोलावण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

**<><><><><>**

राज्यसभेच्या निवडणुकीसाठी राज्यातल्या सात जागांसाठी आज ज्येष्ठ नेते शरद पवार, रामदास आठवले, विनोद तावडे, पार्थ पवार यांच्यासह ९ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यात भाजपाकडून रामराव वडकुते आणि माया इवनाते यांचा समावेश आहे. शिवसेनेकडून ज्योती वाघमारे तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून पार्थ पवार यांनी अर्ज दाखल केला. महाविकास आघाडीच्या वतीने शरद पवार यांचा अर्ज दाखल झाला आहे. कांते सायाना, उमेश मेहत्रे यांनी अपक्ष अर्ज दाखल केले. मात्र सूचक म्हणून १० आमदारांची स्वाक्षरी नसल्याने हे अर्ज छानन्नी मध्ये बाद होण्याची शक्यता आहे. या अर्जांची छाननी उद्या होणार आहे.

**<><><><><>**

बिहारचे मुख्यमंत्री नीतिश कुमार यांनी राज्यसभा निवडणुकीसाठी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याचं नितीश कुमार यांनी आज समाजमाध्यमांवर जाहीर केलं. आपल्या संदेशात त्यांनी बिहार विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांप्रमाणेच संसदेच्या दोन्ही सभागृहांचा सदस्य बनण्याची इच्छा व्यक्त केली आहे. बिहारचे मुख्यमंत्री म्हणून सर्वाधिक काळ सुमारे २ दशकं काम करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी बिहारच्या जनतेचे आभार मानले आहेत.

<><><><><>

नेपाळमध्ये नव्या प्रधानमंत्र्याच्या निवडीकरता संसदीय निवडणुकांसाठी आज शांततेत मतदान पार पडलं. केवळ काही तुरळक ठिकाणी मतदान प्रक्रियेत बाधा निर्माण करणाऱ्या घटनांची नोंद झाल्याचं तिथल्या निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. सगळ्या मतपेट्या संकलित केल्यानंतर लगेचच मतमोजणीला सुरुवात होणार असल्याचंही निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. नेपाळी संसदेच्या २७५ सदस्यांसाठी ही निवडणूक होत असून, त्यापैकी १६५ सदस्य थेट मतदान पद्धतीनं तर ११० सदस्य मतांच्या प्रमाणाच्या आधारे निवडले जाणार आहेत.

<><><><><>

अमेरिका आणि इस्रायलसोबत सुरू असलेल्या युद्धामुळे मरण पावलेल्या इराणच्या नागरिकांची संख्या किमान १ हजार २३० वर पोहोचली आहे. तर लेबननमधल्या मृतांचा आकडा ७७ वर पोहोचला आहे. या हल्ल्यात ५२७ नागरिक जखमी झाल्याची माहिती लेबननच्या आरोग्य मंत्र्यांनी दिली आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनीही आज इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांच्याशी चर्चा केली. त्यांनी ओमानचे परराष्ट्र मंत्री सय्यद बद्र बिन हमद बिन हमूद

अल्बुसैदी यांच्याशी संवाद साधला, आणि पश्चिम आशिया क्षेत्रातल्या संघर्षाबाबत चर्चा केली.

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी आज दिल्लीतल्या इराणच्या दूतावासाला भेट दिली.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेतला दुसरा उपांत्य सामना मुंबईतल्या वानखेडे मैदानावर सुरू आहे. भारताविरुद्धच्या या सामन्यात इंग्लंडनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

सलामीवीर अभिषेक शर्मा दुसऱ्या षटकात ९ धावांवर बाद झाला. त्यानंतर संजू सॅमसननं इशान किशनच्या साथीनं डाव सावरला. ७ षटकार आणि ८ चौकारांच्या मदतीनं संजू सॅमसन यानं ४२ चेंडूत ८९ धावा केल्या.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १४ षटकात ३ बाद १६७ धावा झाल्या होत्या.

उपांत्य फेरीतल्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडनं काल दक्षिण आफ्रिकेवर ९ गडी राखून विजय मिळवला आणि अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. अंतिम सामना रविवारी अमदाबादमध्ये रात्री ७ वाजता सुरू होणार आहे.

**//<><><><><>//**